# सं पा द की य

## एक पत्थर तो तबीयत से उछालो यारो!

पुणे येथील एल्गार परिषद आणि त्यानंतर १ जानेवारी २०१८ रोजी भीमा–कोरेगावच्या परिसरातील जातीयवादी झुंडींनी बेसावध समूहावर केलेला सशस्त्र हल्ला हे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट असून या प्रकरणात देशातील महत्त्वाचे विचारवंत, मानवी हक्क कार्येकर्ते आणि कलावंत मागील तीन–चार वर्षांपासून कैदेत आहेत. भीमा–कोरेगाव प्रकरणात गोवण्यात आलेले वरवरा राव, गौतम नवलखा, सुधा भारद्वाज, अरूण फरेरा, वर्नोन गोन्जालविस, फादर स्टॅन स्वामी, आनंद तेलतुंबडे, महेश राऊत, सुधीर ढवळे, शोमा सेन, रोना विल्सन, सागर गोरखे, सुरेंद्र गडलिंग, रमेश गायचोर हे सर्वच विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंत म्हणजे देशातील समतावादी मुक्तिगामी चळवळीमधील अतिशय प्रतिष्ठित व सुपरिचित अशी नावे आहेत. त्यांना या प्रकरणात त्यांच्या विरुद्ध कोणतेही ठोस पुरावे उपलब्ध नसतानाच गोवण्यात आल्याचे बोलले जात आहे. इतकेच नव्हे तर बनावट पुरावे तयार करुन अतिशय हास्यास्पद आरोपांखाली त्यांच्या विरोधात कारवाई सुरू असल्याचेही समोर आले आहे. इतके दिवस उलटून सुद्धा त्यांच्या विरोधात आरोपनिश्चिती होऊ शकलेली नाही. आजवर त्यांच्यापैकी कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यात किंवा गुन्हेगारी षडयंत्रात सहभाग सिद्ध झालेला नसतांना वारंवार त्यांचा जामीन नाकारला जातो आहे. ही बाब न्यायीकदृष्ट्या कमालीची आश्चर्यकारक आणि तितकीच असामान्य म्हणावी लागेल. त्यादृष्टीने हे प्रकरण देशाच्या इतिहासात लोकशाहीला व न्यायव्यवस्थेला काळीमा फासणारे प्रकरण म्हणून नोंदविले जाईल याविषयी शंका नाही.

ज्यांच्या विरोधात हा खटला सुरू आहे ते सर्व विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंत आज ज्या मूल्यांकरिता, हक्कांकरिता आणि आदर्शांकरिता लढत आहेत ती मूल्ये, हक्क आणि आदर्श भारतीय संविधानाने पुरस्कृत केलेले आहेत. दलित, आदिवासी, भटके–विमुक्त जातिजमाती, अन्य मागासवर्ग, असुरक्षित अल्पसंख्याक धर्मसमूह आणि समस्त दलित–शोषित–पीडित–स्त्री–पुरुषांच्या मानवी हक्कांसाठी आवाज मूखर करणे हा गुन्हा असू शकत नाही. त्यांच्या सामाजिक–आर्थिक स्वातंत्र्याची हमी संविधानाने दिली असतांना संवैधानिक तरतुदींची अंमलबजावणी होत नसेल तर त्यासाठीचे प्रबोधन करणे हा काही गुन्हा असू शकत नाही. लोकशाहीसंमत चौकटीत राहून लेखन करणे हा गुन्हा असू शकत नाही. परंतु त्यांच्या त्याच कृतीला गुन्हा मानून त्यांच्या विरोधात कारवाई सुरू असल्याचे दिसते आहे. भीमा–कोरेगाव प्रकरणाचा अधिक व्यापक पातळीवर अर्थ समजून घेण्याची आवश्यकता आहे. कारण हे प्रकरण वरकरणी वाटते तसे केवळ तुरंगात खितपत पडलेल्या काही विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंतांना लक्ष्य करण्यापुरते सीमित नक्कीच नाही. घटनात्मक चौकटीत राहून मार्क्स–फुले–आंबेडकर–पेरियार यांच्या विचारांवर वाटचाल करणाऱ्या अनेक चळवळी देशात आहेत. भीमा–कोरेगाव केसच्या निमित्ताने त्या चळवळींचे आणि चळवळींमधील विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंतांचे सरसकट गुन्हेगारीकरण करुन त्यांना कलंकित करण्याचे व्यापक षडयंत्र इथल्या सत्ताधारी वर्गजातवर्चस्ववादी शक्तींनी रचले असावे असे वाटण्याजोगी ही परिस्थिती आहे.

जाहीर संमेलनांमधून मुसलमानांचा कत्लेआम

करण्याच्या घोषणा देणारे गुन्हेगार मोकाट आहेत. संविधानाची होळी करुन हिंदुराष्ट्र निर्मितीच्या घोषणा देणाऱ्यांवर कोणतीही कारवाई होत नाही. देशात जमातवादी दंगली पेटवण्यासाठी चिथावणीखोर वक्तव्ये करणाऱ्या लोकप्रतिनिधींना हातही लावला जात नाही. क्षुल्लक कारणांसाठी महाराष्ट्र पेटून उठेल अशा वल्गना करणारांना अडवले जात नाही. बाबरी मशिद विध्वंसनाच्या व्यापक गुन्हेगारी कटात सहभागी असलेले गुन्हेगार आजही मोकाट आहेत. गुजरात नरसंहाराचे गुन्हेगार मोकाट आहेत. आणि जे लोक मानवी हक्कांसाठी, मूलभूत नागरी सुविधांसाठी, संविधानाने सांगितलेली सामाजिक-आर्थिक समता स्थापित व्हावी म्हणून लोकशाही मार्गाने लढतात, लेखन करतात, प्रबोधन करतात त्यांना गुन्हेगार ठरवले जात आहे. असे असेल तर ही गोष्ट हिटलरच्या फासिवादी दमनकारी शासनसत्तेची आठवण करुन देणारी नव्हे काय?

एल्गार परिषदेतील वक्त्यांनी चिथावणीखोर भाषणं केली होती म्हणून दुसऱ्या दिवशी भीमा-कोरेगाव परिसरात बेसावध समूहावरील हल्ला झाला आणि जाळपोळीच्या घटना घडल्या असा जो कार्यकारणसंबंध जोडला जातो आहे तो हिंसक हल्लेखोरांचा बचाव करण्यासाठी केला जाणारा तथ्यहीन युक्तिवाद आहे. एल्गार परिषदेतील भाषणे आणि दुसऱ्या दिवशी भीमा-कोरेगाव परिसरात झालेला हल्ला यांचा असा बादरायण संबंध जोडला जाणे म्हणजे जातीयवादी पूर्वग्रहाने पछाडलेल्या विकृत मेंदूचीच उपज असू शकते. ज्यांनी तथाकथित चिथावणीला बळी पडून निष्पाप, बेसावध व निःशस्त्र समूहावर हल्ला केला ते हिंसक हल्लेखोर आजही मोकाट आहेत. समजा चिथावणीखोर भाषणं झाली हे क्षणापुरते गृहीत धरले तर त्याचा अर्थ हिंसक हल्लेखोर जमावाला हिंसाचार माजवण्याचा मुक्त परवाना मिळाला असा होतो काय? एल्गार परिषदेत चिथावणीखोर म्हणता येईल असे काय होते ते अद्यापपर्यंत सिद्ध होऊ शकलेले नाही. त्यामुळे एल्गार परिषदेशी संबंधित असण्याच्या कारणांवरुन निरपराध लोकांना डांबून ठेवले आहे ही बाब स्पष्ट होते.

निरपराध विचारवंत, कार्यकर्ते व कलावंतांच्या विरोधात सुरू असलेला हा खटला आणि त्याची प्रक्रिया म्हणजे खरे तर निरपराध्याला अपराध न करण्याची शिक्षा देण्याचा प्रकार होय! प्रदीर्घ काळ रेंगाळत राहणाऱ्या न्यायालीन प्रक्रियेत निरपराध कैद्यांबरोबरच त्यांच्या कुटुंबियांना नाहक शिक्षा भोगावी लागते आहे. या प्रकरणामुळे देशातील तमाम जनवादी-मुक्तिवादी-समतावादी चळवळींना बदनाम करुन त्यांच्या भोवती संशयाचे धुके निर्माण केले जात आहे. त्यामुळे हे प्रकरण म्हणजे कायद्याच्या राज्याचा व न्यायप्रणालीचा कमाल अधःपात घडवून आणला जात असल्याचे चपखल उदाहरण होय असेच म्हणायला हवे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेला उद्देशून बोलताना लोकशाहीच्या यशस्वीतेच्या काही पूर्वअटी सांगितल्या आहेत. त्यातील एक पूर्वअट होती की, राज्यकर्त्यांनी घटनात्मक नीतिमत्तेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यकर्त्यांवर असा संशय घेण्याचे ठोस कारण होते. त्यांचा अनुभव होता की, राज्ययंत्रणेच्या पक्षपाती वर्तनाचे सर्वात मोठे बळी दलित-आदिवासी-अल्पसंख्यांक जनसमूह असतात. त्यांनी आपल्या लेखनात स्पष्टपणे नोंदवून ठेवले आहे की, जोवर इथे जातजमातीय वास्तव कायम आहे तोवर इथल्या राज्ययंत्रणेचे चारित्र्य व वर्तन जातजमातीय पूर्वग्रहांच्या चौकटीत आणि पक्षपाती स्वरूपाचेच राहणार आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यकर्त्या वर्गजातींकडून त्यांनी स्वतःचे सर्व प्रकारचे पूर्वग्रह आणि हितसंबंध बाजूला सारुन घटनात्मक नीतिमत्तेचे पालन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली होती. भीमा-कोरेगाव केसमध्ये राज्ययंत्रणेचा जातीयवादी पक्षपात ऊग्र स्वरूपात प्रकट होताना दिसतो आहे. आणि याचे एकमेव कारण हे आहे की, या प्रकारणात गोवण्यात आलेले विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंत हे देशातील समस्त दलित-शोषित-पीडित-कष्टकरी जनसमूहांचे प्रतिनिधित्व करणारे आहेत.

राज्यसंस्थेद्वारा घटनात्मक मूल्यांची जोपासना होणे गरजेचे आहे असे जर कुणी बोलून दाखवले असेल तर त्याला चिथावणी कसे म्हणायचे? देशातील दलित-शोषित-पीडित-अल्पसंख्यांक समूहांच्या नागरी हक्कांचे व मानवी हक्कांचे रक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे जर कुणी बोलून दाखवत असेल तर त्याला चिथावणी कसे म्हणायचे? विषमता, शोषण, अन्याय, अत्याचार, हिंसा, अमानुषता, दमन, पिळवणूक ही जर सामाजिक वास्तविकता असेल आणि ती नष्ट करण्याविषयी जर कुणी बोलत असेल तर त्याला चिथावणी कसे म्हणायचे? विषमता, शोषण, अन्याय, अत्याचार, हिंसा, अमानुषता, दमन, पिळवणुकीखाली भरडल्या जाणाऱ्या समूहांनी त्याविरोधात लोकशाही मार्गाने सभा आयोजित करुन एल्गार पुकारणे हा गुन्हा कसा काय असू शकतो? हे प्रश्न उपस्थित करण्याची जबाबदारी चळवळींची आहे आणि त्या प्रश्नांची उत्तरं देण्याची जबाबदारी शासनकर्त्यांची आहे.

देशात जात-सामंती-भांडवली व्यवस्थेच्या पायावर उभी असलेली सर्वंकष विषमता, शोषण, दास्य, हिंसा, अमानुषता, अन्याय, अत्याचार कार्यरत आहेत तोवर समतेची, शोषणमुक्तीची, सर्वंकष मानवमुक्तीची चळवळ थांबणार नाही. चळवळींचे जोमदार अस्तित्व म्हणजे भारतीय लोकशाही आणि इथला समाज अधिकाधिक उन्नत होत जाणे होय. भीमा-कोरेगाव प्रकरणात नाहक अडकवण्यात आलेल्या विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंतांचा मुक्तसंचार म्हणजे देशातील लोकशाही व्यवस्था सुरक्षित असण्याची हमी होय. त्यांचे शब्द, त्यांची भाषा, त्यांच्या संज्ञा- संकल्पना-परिभाषा, एकणूच त्यांचे विचार आणि अभिव्यक्तीची शैली ह्या गोष्टींची प्रस्थापित राज्यकर्त्या वर्गजातींनी स्वतःला सवय लावून घेण्याची आवश्यकता आहे. त्यांना जर लोकशाही मार्गाने चाललेल्या चळवळींचे आणि त्यातील विचारवंतांचे, कार्यकर्त्यांचे व कलावंतांचे अस्तित्व खपत नसेल तर याचा अर्थ असा आहे की, त्यांना संविधानाचे अस्तित्वही खपत नसावे. जोवर देशामध्ये विषमता, शोषण, दास्य, हिंसा, अमानुषता, अन्याय, अत्याचाराचा राजरोस नंगानाच चालू राहील तोवर त्याच्या विरोधातील चळवळी, कार्यकर्ते, विचारवंत आणि कलावंत आपली भूमिका बजावत राहतील. परिवर्तनाची, शोषणमुक्तीची, समतेची, मानवमुक्तीची चळवळ थांबणार नाही याची खूणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधून ठेवावी.

बौद्ध धम्माची मूळ प्रकृती ही वैज्ञानिक असल्याचे सांगतानाच त्यातून जगाला उद्याचे क्रांतिविज्ञान मिळू शकते असा विचार जागवणारा विचारवंत म्हणून आनंद तेलतुंबडेंचे नाव घ्यावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमधील क्रांतिकारी प्रेरणांचा पुरस्कार करण्याची आवश्यकता अधोरेखित करणारे आनंद तेलतुंबडे आणि त्यांच्यासारखेच सर्व विचारवंत, कार्यकर्ते आणि कलावंत डांबून ठेवले असताना चळवळी शांत आहेत. चळवळीतील नेते आणि लोक जणू काही आपल्या अवतीभोवती काहीच घडले नाही अशा मानसिकतेत वावरताना दिसताहेत. ते सदैव कुठल्या ना कुठल्या तरी सेलिब्रेशनच्या मोडमध्येच बघावयास मिळतात. हा बेफिकिरपणा आहे की, व्यवस्थेने बेमालूमपणे चढवलेल्या बधिरीकरणाच्या लशीचा अंमल आहे? आनंद तेलतुंबडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली झालेल्या महाडच्या क्रांतिकारी सत्याग्रहावर संशोधनात्मक ग्रंथ लिहिला; आणि आज आनंद तेलुतंबडेंच्या सुटकेसाठी सत्याग्रह करण्याची वेळ आली आहे!

●

**देवेंद्र इंगळे**
इतिहासाचे प्राध्यापक
मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव
ingledevs@gmail.com